अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ११ ऑक्टोबर २०२३ | ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : १३ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## रिझवान-शफिकच्या शतकांच्या जोरावर पाकने श्रीलंकेला धूळ चारली

**हैदराबाद** : पाकिस्तानपुढे विजयासाठी श्रीलमकेने ३४५ धावांचे दमदार आव्हान ठेवले होते आणि त्यांची २ बाद ३७ अशी अवस्था केली होती. पण त्यानंतर मोहम्मद रिझवान आणि अब्दुल्ला शफिक यांनी शतके झळकावत संघाचे आव्हान कायम ठेवले होते. शतकवीर शफिक बाद झाला, पण त्यानंतर रिझवानने धडाकेबाज फटकेबाजी करत पाकिस्तानला हा सामना जिंकवून दिला. पाकिस्तानचा या वर्ल्ड कपमधील हा सलग दुसरा विजय ठरला आहे.



पाकिस्तानने यावेळी सहा विकेट्स राखत श्रीलंकेवर सहज विजय साकारला. रिझवानने यावेळी नाबाद १३१ धावांची खेळी साकारली. श्रीलंकेन पाकिस्तानपुढे ३४५ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात चांगली झाली नव्हती. कारण पाकिस्तानला पहिला धक्का १६ धावांवर बसला होता. त्यांनतर फलंदाजीला आला तो पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम. यावेळी बाबरकडून संघाला मोठ्या अपेक्षा होत्या. कारण पहिल्या सामन्यात बाबर अपयशी ठरला होता. दुसऱ्या सामन्यातही बाबरला मोठी खेळी साकारण्यात यश आले नाही. दुसऱ्या सामन्यात बाबर हा १० धावांवर बाद झाला आणि पाकिस्तानची २ बाद ३७ अशी अवस्था झाली होती. पण त्यानंतर पाकिस्तानचा डाव सावरला तो मोहम्मद रिझवान आणि अब्दुल्ला शफिक या दोघांनी आणि त्यामुळे पाकिस्तानचे आव्हान जिवंत राहिले.

## मोहोळचे राजकीय वातावरण तापले

# ‘चक्री-वक्री’ हत्यार उपसून दोनही पवार गट आमने-सामने

सुराज्य/मोहोळ

**एखादया प्रश्नावर आंदोलन करणे हा लोकशाही चा अधिकार असतो प्राणांतीक उपोषण आमरण उपोषण आणि चक्रीय उपोषण अशा माध्यमातून ही आंदोलने केली जातात पण मोहोळ तालुक्यात राजकीय दृष्ट्या संवेदनशील गाव असलेल्या अनगर मध्ये नुकतेच दुय्यम निबंधक कार्यालय मंजूर करण्यात आले आहे हे कार्यालय तातडीने व्हावे म्हणून अजित पवार यांच्या गटां ने चक्री उपोषण सुरू केले आहे तर त्या कार्यालयाला स्थगित देण्यात यावी म्हणून शरद पवार गटां ने वक्री उपोषण सुरू केले आहे राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर मोहोळ तालुक्यात दोन्ही गट पहिल्यांदाच आमने-सामने आले आहेत त्यामुळे मोहोळचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.**



अजित पवार गट



शरद पवार गट

अनगरमधील नव्या मंजूर दुय्यम निबंधक कार्यालयासाठी शरद पवार आणि अजित पवार गटात जुंपली असून, सदरचे दोन्ही गट समोरासमोर बाह्या सरसावून उभे आहेत. अनगरमध्ये दुय्यम निबंधक कार्यालय व्हावे यासाठी अजित पवार गटाने मोहोळ तहसील कार्यालयापुढे सोमवारपासून चक्री उपोषण सुरु केले आहे तर दुसरीकडे यास स्थगिती मिळावी, यासाठी शरद पवार गटाने त्याच ठिकाणी मंगळवारपासून वक्री उपोषण सुरु केले आहे. त्यामुळे सोलापूरच्या राजकारणात चक्री आणि वक्री या अजब उपोषण आंदोलनाची चर्चा भलतीच रंगली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस एकसंध असताना उपमुख्यमंत्री अजित पवार हे अनगर येथे आले होते. वर्षभरापूर्वीच्या एका मोठ्या कार्यक्रमामध्ये अनगर येथे दुय्यम निबंधक कार्यालय व्हावे, अशी मागणी माजी आमदार राजन पाटील यांनी केली होती. दरम्यान, राष्ट्रवादीचा अजित पवार गट भारतीय जनता पार्टीला जाऊन मिळाल्यानंतर आणि सत्तेमध्ये सहभागी झाल्यानंतर त्यांच्याच प्रयत्नाने या विषयाला दि. १४ सप्टेंबर २०२३ रोजी विशेष बाब म्हणून मंजुरी मिळविण्यात आली.

अजित पवार गटाने हे कार्यालय अनगर येथे मंजूर झाले असेल तर ते अनगर येथे सुरू करावे, अशी मागणी केल्याचे येथील ग्रामस्थ महेश देविदास शेंडगे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

शेंडगे म्हणाले, मोहोळ येथील कार्यालय परिसरामध्ये महिलांची कुचंबना होते. महिलांसाठी स्वच्छतागृह नाही. त्यामुळे याची मोठी अडचण होते. यावली हे मोहोळपासून सहा किलोमीटर असून, अनगरदेखील सहा किलोमीटर आहे. त्यामुळे हायवे महामार्गावरून प्रवास करून धोका पत्करण्यापेक्षा अनगर हे सोयीचे आहे. यावेळी अजित पवार गटाचे महेश चेंडगे, रोहित जगताप, गणेश पाटील, पांडुरंग माळी, रामदास चवरे, भारत सूतकर, नितीन माळी, बापू गायकवाड, अमोल राठोड, लक्ष्मण नस्टे, धुळा सकट, यश पासले, श्रीमंत सरक, अभिजित सरक, आदींसह अन्य पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

तर शरद पवार गटाचे रमेश बारसकर यांच्यासह मंगेश पांढरे, रिवाज शेख, संगिता पवार, सुरज जाधव, नागेश माळी, जितेंद्र अष्टूळ, अनिता बळवंतराव यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### चुकीची विभागणी नको...

मोहोळ येथे सगळ्यांना सोयीचे असताना चुकीच्या पद्धतीची ऑफिसची विभागणी करणे बरोबर नाही. या आदेशाला स्थगिती द्यावी अशी मागणी प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्यासह राष्ट्रवादी शरद पवार(गट) आणि तालुक्यातील जनतेने केली आहे.

याप्रसंगी शरद पवार गटाचे मंगेश पांढरे यांनी पोतराजाचा वेष परिधान केला होता. हातात चाबूक घेवून आवाज काढत नाचत होते. त्यामुळे त्यांचा हा पोषाख सर्वांना वेधून घेत परिसरातील नागरीक त्यांना आवर्जून पहात होते.

मोहोळ दुय्यम निबंधक कार्यालय हे तालुक्याच्या दृष्टिकोनातून सगळ्यांच्या सोयीचे आहे. जेणेकरून खरेदी विक्री करण्यासाठी आलेल्या जनतेच्यादेखील सोयीचे आहे. तालुक्यातील आमदार यशवंत माने आणि माजी आमदार राजन पाटील यांच्या मतानुसार प्रशासनाने अशा प्रकारचा प्रस्ताव तयार करून पाठविला आहे, तो चुकीचा आहे. उद्योग व्यवसायावर याचा परिणाम होणार आहे. शहरातील छोटे छोटे व्यवसाय यांचे नुकसान करणार आहे.

## रेल्वे कोच जळाल्याने सव्वासात लाखांचे नुकसान

### कोचखाली चूल व शेगडी पेटवल्याने घडला अपघात

सुराज्य/कुर्डुवाडी

रेल्वे कोचखाली जेवण बनवण्यासाठी चूल व शेगडी मांडल्याने रेल्वे कोचला आग लागून सुमारे सव्वा सात लाखांचे सार्वजनिक मालमत्तेचे तसेच रेल्वेचे नुकसान झाले आहे. ही घटना दि.४ ऑक्टोबर रोजी दु.२.४५ वा सुमारास हरंगुळ(लातूरच्या पुढे) रेल्वे स्टेशनच्या लुपलाइन ३ वर घडली.

याबाबत रेल्वे स्टेशन मास्तर के. गोविंदराव (रा.हरंगुळ मुळ गाव विशाखा पट्टणम् आंध्रप्रदेश) यांनी कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

याबाबतची माहिती अशी की- फिर्यादी स्टेशन मास्तर के गोविंदराव यांची दि.४ रोजी हरंगुळ रेल्वे स्टेशन येथे दु.१२ ते रात्री १० पर्यंत ड्यूटी होती. दरम्यान दु.२.४५वा स्टेशन मास्तर के गोविंदराव यांना हरंगुळ रेल्वे स्टेशनच्या लुपलाईनवर उभ्या असलेल्या चार पैकी एका कोचला आग लागली असल्याचे दिसले. स्टेशन मास्तर के. गोविंदराव यांनी आग लागल्याचे पाहून तत्काळ अग्नीशमन दलाला व आरपीएफ स्टाफला कळवून आग विझवली. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांनी कोचच्या स्थितीची पाहणी केली असता चार कोच पैकी एका कोचच्या खाली भंगार खरेदी व्यावसायिक शेरसिंग अग्रवाल याच्याकडे काम करणाऱ्या आर. एस चौधरी,राममिलन चौधरी व बादल चौधरी यांनी कोचच्या खाली जेवण बनविण्याकरीता चूल व शेगडीची आगळीक केली होती. त्यातूनच चारपैकी एका रेल्वे कोचला आग लागून सार्वजनिक मालमत्तेचे व रेल्वेचे सुमारे सव्वा सात लाख रूपयांचे नुकसान झाले आहे. फिर्यादी रेल्वे स्टेशन मास्तर के गोविंदराव यांच्या फिर्यादी वरुन आर.एस चौधरी,राम मिलन चौधरी व बादल चौधरी यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## पंढरपूर ते फलटण या नवीन ब्रॉडगेजचे काम रेल्वे मंत्रालयाकडे

सुराज्य/पंढरपूर



फलटण ते पंढरपूर नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग आता रेल्वे मंत्रालयातर्फे पूर्ण करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या प्रकल्पासाठी राज्य शासन ९२१ कोटींचा ५० टक्के वाटा उचलणार आहे. जानेवारी २०२३ या महिन्यातच त्याला मान्यता देण्यात आली होती.या मार्गाचे काम करण्याचे अधिकार महारेल यांना देण्यात आले होते मात्र,माढ्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी दि. ६ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य मंत्रालयाचे प्रधान सचिव,परिवहन गृह विभागाचे संचालक पराग जैन यांच्याशी पत्र व्यवहार केला होता.हे काम महारेल ऐवजी रेल्वे मंत्रालयाकडे देण्याची मागणी खा.निंबाळकर यांनी या पत्रात केली होती.त्याची दखल घेवून राज्य मंत्रीमंडळाने हा निर्णय घेतला.









पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : सोलापूर विद्यापीठाच्या १९व्या युवा महोत्सवाचा शुभारंभ मंगळवारी पंढरपूर येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये करण्यात आला. यावेळी लावणीसह विद्यार्थ्यांनी विविध कला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

## शाळेत निघाला धामण साप



**सोलापूर** : जिल्हा परिषद शाळा इंगळगी येथे धामण जातीचा साप निघाला होता. सर्पमित्र आणि मुख्याध्यापकांनी सापाला पकडून निसर्गाच्या सानिध्यात सोडून दिले. मंगळवारी दुपारी तीन वाजता मुलींच्या स्वच्छतागृह परिसरात नऊ फुट लांबीचा धामण जातीचा साप निघाला होता. मुली घाबरून पळापळ करत होत्या. याची खबर गावातील सर्पमित्राला कळविण्यात आली. सर्पमित्र दत्ता राऊत व मुख्याध्यापक रवि बिराजदार यांनी मोठ्या शिताफीने साप पकडले. सापाची प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यानंतर या सापाला वन विहारात सोडून दिल्याचे मुख्याध्यापक रवी बिराजदार यांनी सांगितले.

## बँक ऑफ बडोदावर आरबीआयची कारवाई

**मुंबई** : देशाची मध्यवर्ती बँक असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मोठी कारवाई केली आहे. आरबीआयने देशातील सर्वात महत्त्वाच्या सरकारी बँकेवर कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईमुळे ग्राहकांवर थेट परिणाम होणार आहे. आरबीआयने बँक ऑफ बडोदावर कारवाई केली आहे.

बँक ऑफ बडोदाला त्यांच्या मोबाईल अ‍ॅप 'बॉब वर्ल्ड' वर नवीन ग्राहक जोडण्यास तात्काळ प्रभावाने मनाई केली आहे. याचा अर्थ आता नवीन ग्राहक बॉबच्या अ‍ॅपचा वापर करू शकणार नाही. 'बँक ऑफ बडोदा'च्या जुन्या ग्राहकांवर याचा परिणाम होणार नाही. रिझर्व्ह बँकेने 'बॉब वर्ल्ड'च्या जुन्या ग्राहकांना कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागणार नाही याची काळजी घेण्याची सूचना बँकेला केली आहे.

याचा परिणाम बँक ऑफ बडोदाच्या त्या ग्राहकांवर होईल ज्यांचे बँकेत खाते आहे पण ते 'बॉब वर्ल्ड' अ‍ॅपशी जोडलेले नाहीत. रिझर्व्ह बँकेने सांगितले की, अ‍ॅपवर ग्राहक जोडले जाताना काही त्रुटी आढळल्या. ही चिंतेची बाब होती. आरबीआयने म्हटले की, भारतीय रिझर्व्ह बँकेने, बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या कलम ३५ अंतर्गत आपल्या अधिकाराचा वापर करून, बँक ऑफ बडोदाला 'बॉब वर्ल्ड' वर अधिक ग्राहक जोडण्याची प्रक्रिया निलंबित करण्याचे निर्देश दिले आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अहो, तो कप आहे, वर्ल्डकप नाही!!!


कल्याण
490-37-133

मुंबई
123-61-380

## माझ्यावर टीका करण्यापूर्वी सुळेंनी माहिती घ्यायला हवी होती : खा.महास्वामी

सुराज्य/पंढरपूर





राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माझ्याविषयी बोलताना पहिल्यांदा माहिती घ्यायला हवी होती, असा उपदेश सोलापूरचे खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांनी केला आहे.

रविवारी सोलापूरच्या दौऱ्यावर आल्यानंतर सुळे यांनी पत्रकार परिषदेत डॉ.महास्वामींवर टीका केली होती.सोलापूरच्या खासदारांना शोधावे लागते. ते दिल्लीत फक्त एक-दोनवेळा दिसले आणि संसदेत ते कधी बोलले नाहीत. मी दिल्लीत गेल्यानंतर सोलापूर...सोलापूर... म्हणून ओरडेन, अशा शब्दात सुळेंनी डॉ.महास्वामींचा समाचार घेतला होता. तसेच ते मिसिंग झाल्याची तक्रार पोलिस ठाण्यात द्यावी, असे आवाहन केले होते. याला खा. महास्वामी यांनी उत्तर दिले आहे.

मंगळवारी सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवासाठी पंढरपूरच्या दौऱ्यावर आले होते.उद्‌घाटन समारंभ झाल्यानंतर डॉ.महास्वामी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी सुळेंवर प्रतिटीका केलीते म्हणाले की,मी लोकसभेत ९७ टक्के उपस्थिती लावली असून विविध विषयावर १२७ वेळा बोललो. सुळे यांनी माझ्यावर बोलण्याआधी माहिती घ्यायला हवी होती.

### ...पुन्हा मैदानात...

पक्षाने संधी दिल्यास सोलापुरातून पुन्हा एकदा निवडणूक लढवण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली. येत्या लोकसभा निवडणुकीत पक्षाने पुन्हा संधी दिल्यास लढण्यास तयार असल्याचे संकेतही खासदार स्वामी यांनी दिले. वास्तविक खा. स्वामी यांच्या जात प्रमाणपत्राबाबत न्यायालयीन लढाई सुरु असूनही त्यांनी दिलेले संकेत विशेष आहेत.

### दारू प्यायला पैसे दिले नाही

## मुलाने वडिलांच्या डोक्यात घातला दगड

**मोहोळ** : दारु पिण्यास पैसे का देत नाही. तुम्ही माझे खरे आई बाप नाही. एक दिवस तुमचा जीव घेतो, असे म्हणत मुलाने वडिलांच्या डोक्यात दगड घालून त्यांना गंभीर जखमी केले. ही घटना रविवारी सावळेश्वर (ता.मोहोळ) येथे घडली.

अर्जुन वासुदेव पुजारीने त्याच्या आई वडिलांना तुम्ही मला दारू पिण्यास पैसे का देत नाही. तुम्ही माझे खरे आई बाप नाही. तुम्हाला नीट सांगतो. मला पैसे द्या. नाहीतर एक दिवस तुमचा जीव घेतो, असे म्हणत शिविगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. अंगणात पडलेला दगड वडिलांच्या डोक्याला मारला. माथ्याला दगड लागल्याने वडिलांचा माथा रक्तबंबाळ झाला. याबाबत वासुदेव दत्तू पुजारी (वय-७०) यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घोळवे हे करीत आहेत.